# भारतीय शिष्टाचाराची ओळख

भारतीय संस्कृती आणि इतिहास संपूर्ण जगभर प्रसिद्ध आहे. भारतीय लोक, त्यांचे राहणीमान, त्यांची जीवनपद्धती याबाबत अनेकांना उत्सुकता असते. विशेषत: भारतीय कुटुंब व्यवस्थेविषयी सर्वांना विशेषाने ममत्व आहे, असे म्हटले जाते, ज्या विदेशी व्यक्ती भारतीय भूमीवर प्रथम आल्या, त्यावेळी त्यांना इथे बदल करावासा वाटला, परंतु जेव्हा त्या इथे राहिल्या तेव्हा इथली परिस्थितीच त्यांना स्वत:मध्ये बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरली.

जगभरातील २० प्रमुख ख्यातकीर्त विश्लेषकांनी 'एक्झिक्युटिव्ह एटिकेट पॉवर' या नावाने पुस्तक प्रसिद्ध केले असून, भारतात आज (शनिवार) ते प्रसिद्ध होत आहे. एखाद्या कामाची सुरुवात करताना, प्रारंभी कोणत्या गोष्टींकडे अधिक लक्ष देण्यात यावे याबाबत प्राधान्याने लिहिले आहे. यामध्ये सामाजिक गरज, प्रमुख शिष्टाचार, प्रभावशाली व्यक्तिमत्त्व, भारतीय शिष्टाचार पद्धती याबाबत माहिती देण्यात आली आहे.




भारतामध्ये नवी दिल्ली येथे राहत असणाऱ्या संगीता सिंधी बहल या गेल्या २४ वर्षांपासून एअरलाईन्स क्षेत्रात कार्यरत आहेत. विविध ठिकाणी चर्चासत्रे घेणे, व्यवसाय मार्गदर्शन करण्याच्या त्या काम करतात. या पुस्तकात भारतीयांच्या वैशिष्ट्याबाबत त्यांनी लिहिले आहे.

'द आर्ट ऑफ डुईंग बिझनेस इन इंडिया' या आपल्या लेखात त्यांनी भारतीयांच्या वैशिष्ट्याबाबत लिहिले आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतामध्ये कौटुंबिक व्यवस्थेला अधिक महत्त्व दिले जाते. भारतीय कुटुंब व्यवस्था कशी आहे, याची त्यांनी माहिती देताना म्हटले आहे, भारतात सामाजिक व्यवहाराला अधिक महत्त्व दिले जाते. श्रेणीरचनेनुसार दिला जाणारा सन्मान, त्यांचा आदर, आदरातिथ्य, खानपान, कपडे आणि इतर गोष्टींना प्राधान्य दिले जाते.

भारतामधील शासकीय अधिकारी आणि उद्योजक हे धार्मिक कारणासाठी अथवा आनंद घेण्यासाठी सुट्या घेतात. साहेब बाहेर गेले आहेत आणि दोन दिवसानंतर येणार आहेत, हे वाक्य कोणत्याही कार्यालयात आपणास ऐकावयास मिळू शकते.

भारतामधील धर्म, त्यांचे रितीरिवाज, पूजा करण्याच्या पद्धती याबाबतही या लेखात माहिती देण्यात आली आहे.

भारतीय व्यवसायात सर्वोच्च ठिकाणी बसणारी व्यक्ती कोणतेही अंतिम निर्णय घेत असते. शासनासोबतचे व्यवहार नेहमी उशिरा होतात. सर्वांसमोर कोणतीही गोष्ट नाकबूल केली जात नाही, भारतीय कायद्यापेक्षा दिलेल्या शब्दाला अधिक महत्त्व देतात. निर्णयप्रक्रिया ही सर्वसाधारणत: खूप सावकाश होते.

भारतीय शिष्टाचार हा पाश्चिमात्यापेक्षा वेगळा आहे. डोके हलवून हो किंवा नाही, हे सांगितले जाते. भारतीयांमध्ये सर्वात ज्येष्ठ नागरिकांना धार्मिक, शैक्षणिक आणि सामाजिक वर्गात प्राधान्य दिले जाते. हस्तांदोलन हे सर्वसाधारण आहे. मोठ्या शहरात विशेषत: शिकलेल्या वर्गात हे प्रमाण अधिक आहे. नमस्कार करण्यावर अधिक भर दिला जातो.

कोणत्याही बैठकीत अथवा चर्चेत सर्वात ज्येष्ठ व्यक्तीच बोलतात. इतर लोक त्यांच्या सन्मानार्थ त्यांचे ऐकतात. नम्रपणा आणि प्रामाणिकपणा हा सर्वात मोठा गुण मानला जातो. निर्णयही तोच घेत असतो. कोणत्याही बैठकीपूर्वी अथवा चर्चेपूर्वी परवानगी घेणे आवश्यक असते. वातावरणामुळे कपड्यांबाबत फारसे लक्ष दिले जात नाही. बैठकीनंतर एकमेकांना बिझनेस कार्ड देण्याकडे अधिक भर असतो.

भारतीयांच्या घरी गेल्यानंतर होणारे आदरातिथ्यही पाहण्यासारखे असते. घरी गेल्यानंतर आई-वडील काय करतात, मुले काय करतात, जेवणात काय आहे, घराची किंमत किती आहे, याकडे सर्वांचे लक्ष असते. घर ही भारतीयांसाठी सर्वात मोठी अभिमानाची बाब आहे. ते दाखविण्याकडे मोठा कल असतो. हॉटेल्समध्ये गेल्यानंतरही भारतीय व्यक्ती कशाप्रकारे जेवतात, त्यावेळी काय बोलतात, हेही यात नमूद केले आहे.

भारतीयांच्या एकूणातच वागण्याबद्दल, बोलण्याबद्दल, राहणीमानाबद्दल या पुस्तकात नमूद करण्यात आले आहे. भारतीयांना या गोष्टी फारशा वेगळ्या वाटत नसल्या तरी आपण काय करतो, पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत आपले वागणे कसे वेगळे आहे, याची माहिती देणारे हे सुंदर इंग्रजी पुस्तक सर्वांनी वाचण्यासारखे आहे.

**-समीर इनामदार**